## COLLEGE DEVELOPMENT COMMITTEE

College Development Committee for year 2022-2023, of Shri Shivaji Maratha Society's College of Architecture is as follows. It was formed on 7th July 2017.

| Sr. No. | Name of the Member | Post |
|---|---|---|
| 1. | Shri Dr. Nitin N Pawar | Chairman |
| 2. | Shri Janardan Ails Annasaheb G. Thorat,<br>Honorary. Secretary, Shri Shivaji Maratha Society | Member |
| 3. | Shri Subhash Ramchandra Chimbalkar | Member |
| 4. | Shri Sambhaji Sitaram Talekar | Member |
| 5. | Shri. Tulshiram Hari Date | Member |
| 6. | Prof. Chandrakant Subhash Kataria | Principal / Secretary |
| 7. | Prof. Amrita Ashokchandji Bhandari | Head of Department |
| 8. | Prof. Shubhashri DipenduUpasani | Internal Co-ordinator |
| 9. | Prof. Shreyas Amraskar | Teacher Representative |
| 10. | Prof. Sneha Dilwale | Teacher Representative |
| 11. | Prof. Pratima Afzalpurkar | Teacher Representative |
| 12. | Mr. Atharva A Mane | Non-Teaching Representative |
| 13. | Miss Isha Purandare | Students Representative |
| 14. | Master Prasad Mane | Students Representative |

Kataria

PRINCIPAL
Shri Shivaji Maratha Society's
College of Architecture
Aryenshwar, Pune-411009.

Shri Shivaji Maratha Society's College of Architecture, Pune-9.

स्पीड पोस्ट / हस्ते पोहोच
महाविद्यालय विकास समिती
सभा क ०१ / २०२३

जावक क. ४०२ /२०२३
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,
अरण्येश्वर, पर्वती, पुणे - ०९
दि. २३ /०३ /२०२३

## विषयपत्रिका

श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे-०९ च्या महाविद्यालय विकास समितीची सभा मंगळवार दिनांक २८/०३/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अरण्येश्वर, पुणे-०९ च्या कार्यालयात आयोजित करण्यात येत आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**प्रा. चंद्रकांत सुभाष कटारिया**
सचिव / प्राचार्य
महाविद्यालय विकास समिती,
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे-०९

**श्री डॉ. नितीन नारायणराव पवार**
अध्यक्ष,
महाविद्यालय विकास समिती,
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे-०९

**श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर अरणेश्वर, पर्वती, पुणे-०९**

: : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : :

महाविद्यालय विकास समिती : विषय पत्रिका मार्च २०२३

विषय क्र. ०१ (अ) मागील दिनांक २४/०३/२०२२ रोजी झालेल्या सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
(ब) मागील दिनांक २४/०३/२०२२ रोजी सभेत पास झालेल्या ठरावांच्या कार्यवाहीची माहीती घेणे.

विषय क्र. ०२ दिनांक ०१/०४/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ अखेर झालेल्या जमा-खर्चाची माहीती घेणे व मंजुरी देणे.

विषय क्र. ०३ दिनांक ०१/०१/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ अखेर होणऱ्या जमा-खर्चाची माहीती देणे.

विषय क्र ०४ शै. वर्ष २०२३-२४ च्या अंदाजपत्रका ची माहीती घेणे व मंजुरी देणे.

विषय क्र ०५ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सन २०२३ मधील आलेल्या सुट्ट्यांच्या यादीस मंजुरी देणे.

विषय क्र ०६ कौन्सिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांचे मार्फत होणा-या महाविद्यालयाच्या संभाव्य इन्स्पेक्शनच्या तयारीची माहीती घेणे.

विषय क्र. ०७ शै. वर्ष २०२२-२३ साठी महाविद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदीस मंजुरी देणे.

विषय क्र. ०८ महाविद्यालयातील संगणक कक्षा करिता खरेदी कारावयाच्या सोफ्टवेयर बाबतची माहिती घेणे व खर्चास मंजुरी देणे.

विषय क्र.०९ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात ३ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या प्रक्रियेचा आढावा घेणे.

विषय क्र.१० शै. वर्ष २०२२-२३ मध्ये झालेल्या प्रवेशांची माहीती घेणे.

विषय क्र ११ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशाचा टक्का सुधारण्यासाठी करावयाच्या विविध उपाय योजनांची माहीती घेणे.

विषय क्र. १२ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात रिक्त पदांवर नेमावयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या बाबतची माहीती घेणे.

विषय क्र. १३ शै.वर्ष २०२२-२३ साठी शुल्क नियामक मंडळ (FRA) कडून कमी करण्यात आलेली फी (रु.११५०००/- वरून कमी होऊन रु.४७०००/- झाली) बाबत ची माहिती घेणे व ती पूर्ववत करावयाच्या कार्यवाहीचा आढावा आखणे.

विषय क्र. १४ महाविद्यालयात असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कार्माचा-यांनची गेल्या पाच वर्षात कोणत्याही प्रकारची वेतन वाढ झालेली नसल्या बाबतची माहीती घेणे व सेवेच्या कालावधीनुसार संबंधितांना वेतन वाढ देण्याबाबत निर्णय घेणे.

विषय क्र. १५ प्रती सेमिस्टर महाविद्यालयात आयोजित करावयाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी करावयाच्या खर्चाचे नियोजन करणे.

विषय क्र. १६ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध उपक्रमांसाठी उपस्थिती व सहभाग वाढविण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांचा आढावा घेणे.

Kataria

प्रा. चंद्रकांत सुभाष कटारिया
प्राचार्य / सेक्रेटरी
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर, अरण्येश्वर,

मा. डॉ.श्री. नितीन नारायण पवार
अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती,
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्कीटेक्चर

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

: : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : : :

स्पीड पोस्ट /हस्ते पोहोच
महाविद्यालय विकास समिती
सभा क्र. ०१, दि. २८/०३/२०२३

जावक क्र. /२०२२-२०२३
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अरण्येश्वर,
पर्वती, पुणे - ४११००९
दि - ०६/०४/२०२३

## सभेचा वृत्तान्त

श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अरण्येश्वर,पर्वती, पुणे - ४११००९ महाविद्यालय विकास समितीची सभा क्र. ०१, मंगळवार, दि. २८/०३/२०२३ रोजी सकाळी ११ वा. शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अरण्येश्वर,पर्वती, पुणे - ४११००९ येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | मा. सभासदांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. डॉ. नितीन नारायण पवार | अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती,<br>श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर |
| २. | श्री. जनार्दन ग. थोरात | ऑनररी सेक्रेटरी,<br>श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे - ०२ |
| ३. | श्री. सुभाष रामचंद्र चिंबळकर | सभासद |
| ४. | श्री. संभाजी सिताराम तळेकर | सभासद |
| ५. | श्री. डॉ. तुळशीराम हरी दाते | सभासद |
| ६ | प्रा चंद्रकांत सुभाष कटारिया . | प्राचार्य सेक्रेटरी/ |
| ७. | प्रा. अम्रिता अशोकचंदजी भंडारी | विभागप्रमुख |
| ८. | प्रा. शुभश्री दिपेंदू उपासणी | अंतर्गत समन्वयक |
| ९. | प्रा. अजिंक्य प्रभाकर चव्हाण | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | प्रा. ऋषिकेश गुरुप्रसाद पुरंदरे | शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | सौ. आसावरी राजेंद्र वैद्य | मा. शिक्षकेतर प्रतिनिधी |

**विषय क्र. १** महाविद्यालय विकास समितीच्या २४/०३/२०२२ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे

**ठराव क्र. १** दि. २४/०३/२०२२ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताची माहिती महाविद्यालय विकास समितीच्या मा. सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आली व मा. सभेकडून त्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २** दि. ०१/०४/२०२२ पासून दि. ३१/१२/२०२२ अखेर झालेल्या महाविद्यालायाच्या जमा खर्चास मान्यता देणे

**ठराव क्र. २** दि. ०१/०४/२०२३ पासून दि. ३१/१२/२०२२ पर्यंत झालेल्या महाविद्यालयाचा जमा खर्च (परिशिष्ट १) मध्ये सविस्तर सादर करण्यात आला व त्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ३** दिनांक ०१/०१/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ अखेर होणऱ्या जमा-खर्चाची माहीती देणे.

**ठराव क्र. ३** दिनांक ०१/०१/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ अखेर होणारया जमा खर्चाची माहितीची यादी (परिशिष्ट २) सोबत जोडण्यात आली व त्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४** शै. वर्ष २०२३-२४ च्या अंदाजपत्रका ची माहीती घेणे व मंजुरी देणे.

**ठराव क्र. ४** शै. वर्ष २०२३-२४ च्या अंदाजपत्रका ची माहीती परिशिष्ट क्र. ३ मध्ये जोडण्यात आली व त्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ५** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सन २०२३ मधील आलेल्या सुट्ट्यांच्या यादीस मंजुरी देणे.

**ठराव क्र. ५** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडूनसन २०२३ मधील सुट्ट्यांची यादी (परिशिष्ट क्र. ४ ) सभेत सादर करण्यात आली आणि त्यास मंजुरी मिळाली.

**विषय क्र. ६** कौन्सिल ऑफ आर्कीटेक्चर नवी दिल्ली यांचे मार्फत होणा-या महाविद्यालयाच्या संभाव्य इन्स्पेक्शनच्या तयारीची माहीती घेणे.

**ठराव क्र. ६** महाविद्यालय कौन्सिल इन्स्पेक्शनच्या दृष्टीने करीत असलेल्या तयारीची माहिती घेण्यात आली. संगणकासाठी सोफ्टवेयर आणि नियमाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या प्राध्यापकांच्या संखेतील कमी या प्रमुख कमतरता लवकर पूर्ण करण्याच्या सूचना मा. अध्यक्षांकडून करण्यात आल्या.

**विषय क्र. ७** शै. वर्ष २०२२-२३ साठी महाविद्यालयामध्ये ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदीस मंजुरी देणे.

**ठराव क्र. ७** कौन्सिल च्या नियमानुसार आवश्यक असणाऱ्या नवीन पुस्तकांची माहिती घेऊन खरेदी करण्यासाठी कोटेशन मागवून पुढील प्रक्रियेस मंजुरी देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांचा ग्रंथालय वापर व पुस्तक वाचनात वाढ होण्याच्या दृष्टीने योजना आखण्याची मा. अध्यक्षांकडून सूचना करण्यात आली.

**विषय क्र. ८** महाविद्यालयातील संगणक कक्षा करीता खरेदी कारावयाच्या सोफ्टवेयर बाबतची माहिती घेणे व खर्चास मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८** कौन्सिल ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे शैक्षणिक गरजेसाठी संगणक स्थापित करावयाच्या ऑटोकॅड व स्केचप अश्या दोन सोफ्टवेयरच्या खरेदीची व खर्चाची माहिती घेऊन मंजुरी देण्यात आली. तसेच ही खरेदी प्रक्रिया नवीन शै. वर्षाच्या प्रवेश प्रक्रीये पूर्वी पूर्ण करण्याची मा. अध्यक्षांकडून सूचना करण्यात आली.

विषय क्र. ९ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात ३ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या प्रक्रियेचा आढावा घेणे.

ठराव क्र. ९ महाविद्यालय पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी करीत असलेल्या कामाची माहिती घेण्यात आली. असा अभ्यासक्रम भविष्यात फायदेशीर असेल अशी टिपणी मा. सेक्रेटरी साहेबांकडून करण्यात आली.

विषय क्र.१० शै. वर्ष २०२२-२३ मध्ये झालेल्या प्रवेशांची माहीती घेणे.

ठराव क्र. १० शै. वर्ष सन २०२२-२३ मधील आर्किटेक्चर प्रवेश प्रक्रियेची माहिती घेऊन आपल्या महाविद्यालयाची प्रवेश संख्या व एकंदर तुलनात्मक स्थितीचा सभासदांनी आढावा घेतला.

विषय क्र ११ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशाचा टक्का सुधारण्यासाठी करावयाच्या विविध उपाय योजनांची माहीती घेणे.

ठराव क्र. ११ शै.वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशाचा टक्का सुधारण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवत असलेले व वेगवेगळ्या उपाय योजनांची पूर्तता करत आहे. यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मिटिंग मधून समोर आलेल्या तसेच विविध मुद्यांची मा. सभेने माहिती घेतली. प्रवेश चौकशीसाठी महाविद्यालयात आलेल्या नवीन पालक व विद्यार्थांच्या सोयीसाठी स्पष्ट दिसतील असे चौकशी व महाविद्यालय वेळा' असे बोर्ड लावावेत; महाविद्यायाच्या प्रवेश द्वारा जवळ एक टेबल खुर्ची मांडून माहिती मिळण्याची सोय करावी ; बाहेर गावच्या विद्यार्थांच्या एकत्रित प्रवेशांसाठी प्रवृत्त करण्यासाठी उपाय योजना कराव्यात. १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थांना महाविद्यालयाची माहिती सादर केल्यावर अभिप्राय नोंद वहीत भरून घ्यावे; आपल्या १२ वी विज्ञान शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वास्तुकलेच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना काही प्रोत्साहन पर बाबी विद्यार्थ्यांना मिळाव्यात, अश्या काही सूचना व बाबींची मा. सभेकडून चर्चा करण्यात आली. व त्यास मान्यता देण्यात आली.

विषय क्र. १२ शै.वर्ष सन २०२३-२४ साठी महाविद्यालयात रिक्त पदांवर नेमावयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनच्या बाबतची माहीती घेणे.

ठराव क्र. १२ शै.वर्ष सन २०२३-२४ साठी महाविद्यालयात रिक्त पदांवर नेमावयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनच्या बाबतची माहीती घेण्यात आली व योग्य कारवाई करण्यात यावी अश्या सूचना देण्यात आल्या.

विषय क्र. १३ शै.वर्ष सन २०२२-२३ साठी शुल्क नियामक मंडळ (FRA) कडून कमी करण्यात आलेली फी (रु.११५०००/- वरून कमी होऊन रु.४७०००/- झाली) बाबत ची माहिती घेणे व ती पूर्ववत करावयाच्या कार्यवाहीचा आढावा आखणे.

ठराव क्र. १३ शै.वर्ष सन २०२२-२३ साठी शुल्क नियामक मंडळ (FRA) कडून कमी करण्यात आलेली फी (रु.११५०००/- वरून कमी होऊन ती रु.४७०००/- इतकी झाली याबाबत ची माहिती घेतली व ती पूर्ववत करावयाच्या कार्यवाहीचा आढावामा. सभेत घेण्यात आला.

विषय क्र. १४ महाविद्यालयात असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनची गेल्या पाच वर्षात कोणत्याही प्रकारची वेतन वाढ झालेली नसल्या बाबतची माहीती घेणे व सेवेच्या कालावधीनुसार संबंधितांना वेतन वाढ देण्याबाबतनिर्णय घेणे.

ठराव क्र. १४ महाविद्यालयात असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनची गेल्या पाच वर्षात कोणत्याही प्रकारची वेतन वाढ झालेली नसल्या बाबतची माहीती घेण्यातआली व सेवेच्या कालावधीनुसार संबंधितांना वेतन वाढ देण्याबाबत ठराव करून कारभारी मंडळात पाठवण्यात यावा अश्या सूचना मा. सभेकडून करण्यात आल्या.

**विषय क्र. १५** प्रती सेमिस्टर महाविद्यालयात आयोजित करावयाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी करावयाच्या खर्चाचे नियोजन करणे.

**ठराव क्र. १५** प्रति सत्र महाविद्यालयात आयोजित करावयाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी करावयाच्या खर्चासाठी मा. प्राचार्यांना फक्त २५,०००/- रुपये आयत्या वेळेच्या नियोजनासाठी खर्च करण्याची परवानगी देण्यात आली. तसेच अश्या सर्व खर्चाची पूर्ण नोंद ठेऊन संस्था कार्यालयाकडे सादर करावेत अशी सूचना मा. सभेकडून करण्यात आली.

**विषय क्र. १६** महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध उपक्रमांसाठी उपस्थिती व सहभाग वाढविण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांचा आढावा घेणे.

**ठराव क्र. १६** महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध उपक्रमांसाठी उपस्थिती व सहभाग वाढविण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांचा आढावा मा. सभेकडून घेण्यात आला.

वरीलप्रमाणे सर्व ठराव समंत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे प्राध्यापक प्रतिनिधी श्री. चंद्रकांत कटारिया यांनी आभार मानले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपले असे जाहीर करण्यात आले.

**प्रा. चंद्रकांत सुभाष कटारिया**
प्राचार्य /सेक्रेटरी
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर

**डॉ. नितीन नारायण पवार**
अध्यक्ष , महाविद्यालय विकास समिती,
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
कॉलेज ऑफ आर्किटेक्चर

Shri Shivaji Maratha Society's * College of Architecture, Pune-5. *